# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 26/10/2020 (सोमवार)
(सकाळ)

---

### चोरी

पो.स्टे. बेला :– अंतर्गत 12 कि. मी अंतरावर एमएच–44 चंद्रपुर ते नागपूर रोड चिमनाझरी शिवार येथे दिनांक 25/10/2020 चे 04:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सत्यसेलवम पेरीयेस्वामी, वय 30 वर्ष, रा. वडकडु स्ट्रीट वेपमपुंडी पोस्ट गंगावली, जि. सेलम राज्य तामिळनाडु व त्यांचा मित्र मुर्गेसन सेतु याच्यासह टीएन–52/जे–3913 क्रमांकाच्या ट्रकमध्ये कोयंबतुर राज्य तामीळनाडु येथील कंपनीतुन पॅराशुट नारीयल तेलाचे 728 बॉक्स भरुन लखनउ राज्य उत्तरप्रदेश कडे जात होते. त्यादरम्यान एनएच–44 चंद्रपुर ते नागपुर रोड चिमनाझरी शिवारात अज्ञात आरोपीने ट्रकवर चढुन ट्रक मधील 728 तेलाचे बॉक्स पैकी 56 बॉक्स ताळपत्री काढुन अज्ञात पिकअप गाडीमधुन चोरी करुन एकुण 896 किलो तेल किमंती 72,800/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. बेला येथे आरोपीविरुध्द कलम 379, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक ठेंगणे 9823364147 हे करीत आहे.

### जबर दुखापत

पो.स्टे. नरखेड :– अंतर्गत 8 कि. मी अंतरावर येरला पावडे नरखेड येथे दिनांक 23/10/2020 चे 21:00 वा. ते दिनांक 24/10/2020 चे 13:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– शंकरराव लहानु नारनवरे, वय 64 वर्ष, रा. येरला पावडे, नरखेड यांनी आरोपी नामे– भिमराव किसना पाटील, रा. येरला पावडे, नरखेड यास म्हटले की, ''तुझा माझे शेत धुऱ्यावरून रस्ता नसतांनी ट्रॅक्टर का नेले'' या कारणावरून दोघांचा वाद झाला. यानंतर आरोपीने फिर्यादीला हातात दगड उचलुन मनगटाचे वर वरचे भागाला मारले व फ्रॅक्चर केले व पुन्हा मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम 325, 506 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार गजानन शेन्डे 8830107633 हे करीत आहे.

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. कोंढाळी – दिनांक 23/10/2020 चे 18.30 वा. चे सुमारास पो.स्टे. कोंढाळी हद्दीत फिर्यादी यांची 17 वर्षीय अल्पवयीन मुलगी हिला अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम 363 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री ढगे 9518979499 हे करीत आहे.


पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर